# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सुनिता रामचंद्र कांबळे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली **"तिसऱ्या पिढीतील दलित कवयित्री : संध्या रंगारी"** या विषयावरील शोधप्रबंधिका माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. या विषयावरील संशोधन इतर विद्यापीठाच्या किंवा परीक्षा मंडळाच्या कोणत्याही अन्य पदवीसाठी अथवा परीक्षेसाठी सादर केलेली नाही. ही प्रबंधिका मराठीतील आधुनिक मराठी साहित्य वाङ्मयक्षेत्राशी संबंधित असून प्रबंधिका लेखनासाठी संदर्भ ग्रंथांचा जो उपयोग केला आहे त्याचा योग्य निर्देश वेळोवेळी केली आहे.

**ठिकाण :** कोल्हापूर

दिनांक : २१ डिसे. २००५

मार्गदर्शक

(प्रा. डॉ. कृष्णा किरवले)
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# प्रतिज्ञापत्र

"तिसऱ्या पिढीतील दलित कवयित्री : संध्या रंगारी" या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी लिहून पूर्ण केली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी या विद्यापीठाच्या अथवा इतर विद्यापीठाच्या किंवा परीक्षामंडळाच्या कोणत्याही पदवी किंवा पदविका अथवा तत्सम परीक्षेसाठी सादर केलेली नाही. तसेच, संशोधनासाठी जे संदर्भ साधने वापरले आहेत, त्याचा योग्य निर्देश, त्या त्या अनुषंगाने केला आहे.

अभ्यसिका,

२८.१२.०५

**(कांबळे सुनिता रामचंद्र)**

मु. काजिर्णे, पो. हिंडगाव,

ता. चंदगड, जि. कोल्हापूर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# आभार

''तिसऱ्या पिढीतील दलित कवयित्री : संध्या रंगारी'' या विषयावर एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी, विशेष म्हणजे प्रा. डॉ. कृष्णा किरवले यांसारख्या प्रख्यात विचारवंताच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका लिहिण्याची संधी मिळाली त्याचा मला विशेष आनंद होतोय. प्रस्तुत प्रबंधिका लेखनाच्या कामी मला अनेकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे. या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

प्रबंधिकेचा विषय निश्चित करण्यापासून ते प्रबंधिकेचे लेखन पूर्ण होईपर्यंत ज्यांचे अनमोल असे सहकार्य लाभले ते माझे मार्गदर्शन गुरू प्रा. डॉ. कृष्णा किरवले. माझ्या प्रत्येक लहानसहान प्रश्नांची समाधानकारक आणि उपयुक्त ठरणारी स्पष्टीकरणे तर त्यांच्या कडून मिळालीच पण एखादा अभ्यासविषय मुळापासून कसा अभ्यासावा, कशी चिकित्सा करावी याची दृष्टी दिली ती किरवले सरांनी. अत्यंत स्वच्छ, निकोप, मनमोकळा स्वभाव आणि वैचारिक दृष्टी असलेल्या किरवले सरांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मी अधिक पसंत करीन. त्यांच्या सहकार्याला आणि मार्गदर्शनाला आभाराचे गालबोट लावणे व्यक्तिश: मला आवडणार नाही. किरवले सरांबरोबरच त्यांच्या सहचारिनी सौ. कल्पना कृष्णा किरवले मॅडमनी अगदी आपुलकीनं मला जे प्रोत्साहन दिले त्या बद्दल मी त्यांची ही खूप ऋणी आहे.

याचबरोबर एम्.ए. पासूनच ज्यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले ते मराठी विभागातील प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. हिंमाशू स्मार्त, प्रा. नंदू मोरे, प्रा. रणधीर शिंदे आदी सर्व सर तसेच विनय पाटील, सतिश कुसुंबे या सर्वांचेच खुप मोलाचे मार्गदर्शन मिळाले. शिवाय जिथे माझे बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले त्या यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय, हलकर्णी इथले माझे गुरूवर्य प्रा. डॉ. अनिल गवळी, प्रा. राजू पोतदार, प्रा. ए. पी. घोंगडे, प्रा. गोनुगडे, प्रा. जरळी आय. आर. , प्रा. शरयू आसोलकर यांचेही मी मनापासून ऋण व्यक्त करते.

गुरूवर्यांच्या मार्गदर्शनाबरोबरच ज्यांचे पावला-पावलावर सहकार्य घ्यावे लागते ते म्हणजे मित्र-मैत्रिणींचे. अभ्यासाच्या चर्चेबरोबर, कधी-कधी मानसिक आधार देणाऱ्या मैत्रसोबत्यांचा फार महत्वाचा वाटा असतो असे मला वाटते. ज्यांचा विशेष उल्लेख करावा वाटतो ते, प्रदीप कांबळे, विनोद कांबळे, सर्जेराव कांबळे, तसेच माझ्या सखीजणी फैमिदा हकीम, रेखा पाटील, योगिता कांबळे, चंद्रभागा, अनघा किरवले या सर्वांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा यांचा आवर्जून उल्लेख करण्याचा मला विशेष आनंद होतोय.

त्यानंतर ज्यांचे विशेष आभार मानवे वाटते ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे. या ग्रंथालयामधील श्रीमती शैलजा जाधव, नलिनी पाटील, सुमित्रा जाधव, संध्या पाटील, मातेकर सर, मोहिते मॅडम यांचीही मी आभारी आहे.

आणि सगळ्यात शेवटी व सगळ्यात महत्त्वाचे ज्यांच्या उल्लेखाशिवाय व ज्यांच्या प्रोत्साहनाशिवाय माझं कोणतच यश पूर्णत्वाला जाऊ शकत नाही ते माझे आई-आबा. माझी आई सौ. पार्वती रामचंद्र कांबळे, माझे आबा श्री. रामचंद्र धोंडिबा कांबळे आणि माझी आजी श्रीमती नागुबाई धोंडिबा कांबळे या तिघांचाही माझ्या यशात अगदी सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे माझ्यापेक्षा लहान पण माझ्या पेक्षा खूप समंजस व मला प्रोत्साहन देणारी आणि प्रबंधिकेचं लेखन करताना ''आक्का ! झाला प्रबंध लिहून '' असं उत्साहानं विचारणारी माझी लाडकी भावंडं महादेव (पिंट्या) व माधुरी (पिंटी) तसेच परसू, नारायण, जानू, अजित, संभाजी यांचाही उल्लेख तितकाच महत्त्वाचा वाटतो.

या प्रबंधाचे टंकलेखन अगदी सुबकपणे व आकर्षक करून देणारे सचिन कदम (भावना कॉम्प्युटर्स) यांचीही मी मनापासून ऋणी आहे. पुन्हा एकदा सर्वांच्या सहकार्याबद्दल अंत:करणपूर्वक आभार !

**कांबळे सुनिता रामचंद्र**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| पहिले | मराठीतील दलित कविता आणि दलित स्त्रियांची कविता | १ - ६७ |
| दुसरे | संध्या रंगारी यांचे वाङ्मयीन चरित्र | ६८ - ७८ |
| तिसरे | संध्या रंगारी यांच्या कवितेतील दलित स्त्री | ७९ - १०६ |
| चौथे | संध्या रंगारी यांच्या कविता आणि दलित समाज | १०७ - १२९ |
| पाचवे | संध्या रंगारी यांच्या कवितेचे वाङ्मयीन मूल्यमापन | १३० - १५१ |
| | उपसंहार | १५२ - १५७ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १५८ - १६२ |
| | नियतकालिके | |
| | वर्तमान पत्रे | |